# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

## प्रकरण क्र.सीजीआरएफ/एझेड/ग्रामीण/४०९/२०१२/४२

**तक्रार दाखल दिनांक :- ३०/१०/२०१२**
**निकाल दिनांक :- ०१/०१/२०१३**

**तेजाबाई धरमचंद बाकलीवाल,** **तक्रारदार**
**मु. पुरी.पोस्ट सोलेगाव,**
**ता. गंगापूर, जिल्हा औरंगाबाद.**

**विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित ग्रामीण मंडल औरंगाबाद.**
**गैरअर्जदार**

**मंच सदस्य**

**श्री. वि. ब. मंत्री, अध्यक्ष**
**श्री. वि. स. काबरा सदस्य**
**श्री. सु. कि. नरवडे सदस्य/सचिव**

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक ३०/१०/२०१२ रोजी औरंगाबाद मंडळाचे कार्यकारी अभियंता (प्रशासन) व नोडल अधिकारी, औरंगाबाद यांना पाठविण्यात आली. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक ०६/११/२०१२ रोजी ठेवण्यात आली.

# निर्णय

१) विद्युत ग्राहक तक्रारदार यांनी विद्युत पुरवठा बंद केल्यामुळे विद्युत क. उत्तरवादी यांचे कडुन १६,८००/- रुपये ची नुकसान भरपाई मिळावी या करीता सदरील तक्रार दाखल केली आहे.

२) सदरील तक्रारीचे संक्षीप्त स्वरुप असे आहे की,तक्रारदार हा विद्युत ग्राहक असुन त्याचा ग्राहक क्रमांक ५०८६९००००३२० असा आहे.

३) दिनांक १७/०१/२०११ रोजी सकाळी १० वाजता अथवा त्यासुमारास ११ के.व्ही.च्या लाईनवरुन तारांची जोडणी वेगळी करुन ७ ते ८ गांवाची वीज पुर्णपणे खंडीत केली दिनांक २४ जानेवारी रोजी सकाळी १०.०० वा. परत तारा जोडण्यात आल्या तक्रारदाराने सदरील विद्युत पुरवठा खंडीत केल्या मुळे ताशी ३२०/- रुपये प्रमाणे १६८ तासाचे ५३७६०/- व मानसिक त्रासामुळे ताशी ५० रुपये प्रमाणे १६८ तासाचे ८४००/- रुपये द्यावे अशी मागणी केली आहे.तक्रार दाराने पुढे अशी तक्रार केली आहे की,वीज पुरवठा खंडीत झाल्यामुळे तक्रारदारास त्याच्या पिकास पाणी देता आले नाही, त्या मुळे ५५ क्विंटल तुरीच्या उत्पन्नाचे नुकसान झाले आहे, बाजार भावा प्रमाणे सदरील नुकसान रु. २,२०,०००/- चे झाले आहे. तसेच १५ ते २० क्विंटल कापसाचे नुकसान झाले आहे.सदरील कापसाचे बाजार भावा प्रमाणे ९०,०००/- ते १,००,०००/- रु. चे झाले आहे. या करीता तक्रारदाराने विनंती केली आहे की, विद्युत आयोगाच्या २००५ पत्रकाप्रमाणे प्रती तास रु. ५०/- प्रमाणे ८,४००/- रुपये प्रत्येक कृषि पंपासाठी या दराने दोन कृषी पंपाची नुकसान भरपाई १६,८००/- रुपये देण्याचे आदेश द्यावे.

४) उत्तरवादी विद्युत कं. ने सदरील तक्रारीबाबत उत्तर दाखल करुन सदरील मागणीस आक्षेप घेतला आहे. विद्युत कं.ने कथीत केले आहे की, विद्युत पुरवठा सदरील कालावदीमध्ये बंद झालेला नव्हता, त्या मुळे तक्रारदारास नुकसान भरपाई देण्याचा प्रश्न निर्माण होत नाही.

५) विद्युत कं.तर्फे नोडल अधिकारी यांनी जवाब दिला आहे की, विद्युत पुरवठा दिनांक १७/०१/२०११ ते २४/०१/२०११ या कालावधी मध्ये बंद होता हा आरोप चुकीचा

आहे. दिनांक १७/०१/२०११ रोजी सकाळी ११ के.व्ही.च्या लाईनवरुन झंपरींग काढुन विद्युत पुरवठा बंद केल्याची तक्रार चुकीची आहे. असा कोणताही प्रकार झालेला नाही. नोडल अधिकारी यांनी त्या बाबत कनिष्ठ अभियंता यांचा अहवाल सादर केला. विद्युत पुरवठा बंद केलेला नसल्यामुळे नुकसान भरपाई देता येणार नसल्याचे कथन करण्यात आले.

६) तक्रारदार यांनी आपला लेखी युक्तिवाद दाखल केला नोडल अधिकारी यांनी आपला युक्तिवाद केला.

७) कागदपत्रांचे आवलोकन केले असता व युक्तिवाद लक्षात घेता, मंचाच्या निर्णयासाठी खालील मुद्दे उपस्थित होतात.

| **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|
| १) दिनांक १७/०१/२०११ रोजी सकाळी १० वाजेपासून दिनांक २४/०१/२०११ रोजी सकाळी १०.०० पर्यंत विद्युत पुरवठा बंद होता काय ? | नाही |
| २) सदरील विद्युत पुरवठा खंडीत झाल्यामुळे तक्रारदार नुकसान भरपाई मिळण्यास पात्र आहे काय ? | मु.क्र.१ चा निष्कर्ष नकारार्थी असल्याने प्रश्न निर्माण होत नाही |
| ३) तक्रारदार नुकसान भरपाई मिळण्यास जर पात्र असतील तर त्यांना नुकसान भरपाई किती नुकसान भरपाई देणे योग्य होईल. | ---' '--- |
| ४) तक्रार निवारण्या संबंधीचे काय आदेश ? | --' '-- व तक्रार फेटाळण्यात येते |

## निष्कर्षाची कारणे

८) तक्रारदाराने असे कथन केले आहे व पुढे युक्तिवाद केला आहे की, दिनांक १७/०१/२०११ रोजी सकाळी १०.०० वाजता विद्युत पुरवठा खंडीत करण्यात आला त्या मुळे ७ ते ८ गांवाची विद्युत खंडीत झाली. विद्युत पुरवठा खंडीत करुन वीज बिलांची वसुली करण्यात आली. विद्युत बिलांची वसुली झाल्या नंतर दिनांक २४/०१/२०११ रोजी सकाळी १०.०० वाजता विद्युत तारांची जोडणी करुन विद्युत पुरवठा पुन्हा सुरु करण्यात आला. सदरील खंडीत वीज पुरवठ्यामुळे तक्रारदाराने वरिष्ठ कार्यालयाकडे दिनांक २८/०८/२०१२ रोजी तक्रार केलेली आहे. तक्रारदाराने सदरील कालावधी मध्ये विद्युत बिलांची वसुली केली असल्याच्या कथनकाच्या समर्थनासाठी बिलबुक मागविण्यात यावे अशी मंचाकडे मागणी केली परंतु वीज बिल भरणा पावतीवरुन वीज पुरवठा खंडीत झाले असल्याबाबत निष्कर्ष काढणे चुकीचे व अयोग्य होईल या कारणासाठी तक्रारदाराची सदरील मागणी मान्य केली नाही.

९) सदरील कालावधीमध्ये विद्युत पुरवठा खंडीत झाला असल्याबाबत तक्रारदाराने सदरील प्रभागामध्ये शेती करणा-या शेतक-यांचे निवेदन सादर केले. शेतकरी अशोक मोरे,नवनाथ मोरे, लक्षमण राऊत,गंगाराम राऊत, भुंजगराव मोरे, बाळु पुरी, प्रेमचंद मोरे, उत्तम पुरी, दिपक बाकलीवाल, आसराबाई राऊत, ज्ञानदेव राऊत, सुरेशचंद्र तिवारी, राजाराम मोरे, काशीनाथ मोरे, देविदास मोरे, उत्तम मोरे, राजेंद्र तिवारी, रखम राऊत इ. शेतक-यांनी असे निवेदन दिले आहे की, दिनांक १७/०१/२०११ रोजी पासुन २४/०१/२०११ या कालावधी मध्ये विद्युत पुरवठा बंद होता.

१०) नोडल अधिकारी यांनी या उलट असे कथन केले आहे की, सदरील कालावधी मध्ये विद्युत पुरवठा खंडीत झालेला नव्हता. त्यांनी कनिष्ठ अभियंता यांचा अहवाल सादर केला,कनिष्ठ अभियंता यांच्या अहवालाचे निरिक्षण केले असता असे दिसून येते की, विद्युत तारा तोडण्याचे दिनांक १७/०१/२०११ रोजी व दिनांक २४/०१/२०११ रोजी जोडण्याचे आरोपीत कार्य झालेले नाही.

११) तक्रारदाराने युक्तिवाद केला की, सदरील कनिष्ठ अभियंता यांचा अहवाल नंतर तयार करण्यात आला.

१२) परस्पर विरोधी कथानकावर सापेक्ष विचार केला असता असे दिसुन येते की, सदरील कालावधी मध्ये विद्युत पुरवठा बंद केला होता अथवा खंडीत होता या बाबत योग्य तो पुरावा नाही. विविध शेतक-यांचे तक्रारदारांने जे निवेदन दाखल केलेले आहे त्यांचे आवलोकन केले असता असे दिसुन येते की, सर्व निवेदने एकाच फॉर्मेट मध्ये सायक्लोस्टाइल सारखे आहेत.निवेदने शपथेवरचे नाहीत. साक्षीदार नाहीत.अशा अवस्थेमध्ये सदरील निवेदनावर विश्वास ठेऊन निष्कर्ष काढणे व सदरील निष्कर्षाप्रमाणे नुकसान भरपाई देणे योग्य आहे असे मंचाचे मत नाही. या करीता मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष नकारार्थी देण्यात आला.

१३) मुद्दा क्र. १ चा निष्कर्ष नकारार्थी असल्यामुळे त्या अधारीत नुकसान भरपाई देण्याचा प्रश्न निर्माण होत नाही. सबब तक्रार फेटाळणे योग्य आहे. या करीता हे मंच खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

**तक्रारदाराची तक्रार फेटाळण्यात येते**

| | | |
|---|---|---|
| स्वाक्षरीत | स्वाक्षरीत | स्वाक्षरीत |
| **सु. कि. नरवडे** | **वि. स. काबरा** | **वि. ब. मंत्री,** |
| **सदस्य/सचिव** | **सदस्य** | **अध्यक्ष** |